# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Project in Environment Science

### Session: 2017-2018

**Name of the Project: Project on Family Housing Needs**

## Number of Students Enrolled: 20

## Name of Co-ordinator : Prof. Rekha Meshram

## Brief Report on Completion of Project

## Academic Year- 2017-2018

| | |
|---|---|
| Name of the Project Undertaken | Project on Family Housing Needs |
| Academic Session | 2017-2018 |
| Organizing Department/ Committee | Department of Home Economics |
| Total number of students Participated in the project | 20 |
| Brief Report | The Project entitled Family Housing Needs was undertaken by the Department of Home Economics during the session 2017-2018 under the guidelines of the Internal Quality Assurance Cell of the institution. Total 20 students participated in the project activity and successfully completed the project. The completion certificates have been given to the students. All the students found it very interesting to learn through the experiential learning. They enjoyed the project work. |
| Criterion No. I | Metric No:-1.3.2 |

| Signature of Activity Co-ordinator | Signature and Stamp of IQAC Co-ordinator | Signature & Stamp of Principal |
|---|---|---|
| | Co-ordinator, IQAC Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur | Principal Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15 |

## Department of Home Economics

### Name of Project- Project on Family Housing Needs

Academic Session- 2017-18

List of students completing project-

| Sr. NO. | Name of students | Program |
|---|---|---|
| 1 | NILU ROHINIPRASAD VISHWAKARMA | B.A. |
| 2 | POOJA DEORAO NIMBULKAR | B.A. |
| 3 | POOJA SURAJLAL BADWAIK | B.A. |
| 4 | PRANJALI GIRISH GOKHALE | B.A. |
| 5 | PRATIKSHA PANDURANG SOYAM | B.A. |
| 6 | PRIYANKA BABLU HADKE | B.A. |
| 7 | RANU CHAITRAM HANVAT | B.A. |
| 8 | REETA RUKHNANIRAM TIWARI | B.A. |
| 9 | RESHMA RAMESH KSHIRSAGAR | B.A. |
| 10 | SAKINA ASLAM SAIYYAD | B.A. |
| 11 | SANDHYA SONAJI JADHAV | B.A. |
| 12 | SHABNUM SHANKARRAO KOSARE | B.A. |
| 13 | SHIVANI RAJU RASKE | B.A. |
| 14 | SHUBHANGI RAMSEVAK CHOUHAN | B.A. |
| 15 | SIYAWATI MUNNIRAJ PATEL | B.A. |
| 16 | SUPRIYA ANANDRAO CHAHANDE | B.A. |
| 17 | SURABHI RAMKRUSHNA YADAV | B.A. |
| 18 | SWATI JANARDHAN TAGDE | B.A. |
| 19 | SWATI MANOJ HEMNANI | B.A. |
| 20 | UJWALA SANJAY WAKODE | B.A. |

Signatue of Project Co-ordinator

IQAC Coordinator
Co-ordinator, IQAC
Yashoda Girls' Arts &
Commerce College, Nagpur

Principal
Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

**Project Copy- Project on Family Housing Needs- Department of Home Economics**

**2017-2018**

# Certificate

Name of the Department Home Economics

This is to Certify that this Practical Record contains this bonafied practical Work of Mr./Ms. Kavita G. Khodse

Class B.A I st Semester during the academic year 2017

Date:

Signature of Teacher who taught the examine

1)

2)

3)

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL

Asst. Professor
HOD of Home-Eco.
Yashoda Girls' Arts & Com.
College, Nagpur-15

Head of the Department

## ***गृहअर्थशास्त्राच्या व्याख्या***

गृहअर्थशास्त्राचा अर्थ असा घेता येईल की, कौटुंबिक साधनांचा मितव्यय (Economic Use) करून कौटुंबिक उद्दिष्टे गाठण्याकरिता मदत करणारा हा विषय होय. म्हणजेच आपल्याजवळ असणाऱ्या मानवीय व अमानवीय साधनांचा वापर करून कौटुंबिक समाधान प्राप्त करणे.

① लेक प्लेसिड :-

सम्मेलन अमेरिका 1902 मध्ये गृहअर्थशास्त्राची व्याख्या व्यापक पण संकुचित अर्थात सांगितल्या गेली. ती अशी :-

"गृहअर्थशास्त्र म्हणजे अशा सिद्धांतांचे, आदर्शांचे, नियमांचे आणि अवस्थांचे अध्ययन आहे की, जे एका बाजूने मानवनिर्मित तात्कालिक, भौतिक वातावरणाशी संबंधित आहे तर दुसऱ्या बाजूने मानवीय प्रकृतिशी संबंधीत आहे. म्हणजेच या दोन्ही संबंधीशी संबंधित शास्त्रांचे अध्ययन होय."

② डॉ. लिमये :-

"गृहविज्ञान मानवी ज्ञानाची अशी उपयुक्त शाखा आहे की, जी कुटुंबातील घटकांच्या गृहजीवनाशी संबंधित असलेल्या सर्व आवश्यक

विषयाचे ( उदा :- गृहव्यवस्था, आहार, आरोग्य, बालसंगोपन, व्यक्तिविकास ) व्यक्तिविकासाकरिता व सुखी समृद्ध गृहजीवन घालविण्याकरिता अध्ययन करते."

*** स्वयंरोजगाराची परिभाषा ***

① " ज्या वेळेस मालाचे उत्पादन व वितरणावर एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण नियंत्रण असते आणि उद्योगाची पूर्ण जबाबदारी त्या व्यक्तीवर असल्यामुळे त्याला आर्थिक उत्पन्न प्राप्त होते, त्या स्वयंरोजगार असे म्हणतात."

② " स्वयंरोजगार करीत असलेली व्यक्ती स्वत: करिता काम करते, ती दुसऱ्या व्यक्तीकरिता किंवा कंपनीकरिता ज्या त्यांच्या मालकीच्या नसतात, त्यांच्याकरिता काम करीत नाहीत."

③ " जी व्यक्ती स्वयंरोजगार करते, ती पुढील प्रकारचे व्यवसाय करून (अ) एकटा मालक, (ब) भागीदारी, (क) मर्यादित जबाबदारी असलेली कंपनी स्वत: करिता अर्थार्जन प्राप्त करीत असते."

SEAL

Novelty

वरील परिभाषांवरून असे म्हणता येईल की, स्वयंरोजगारात व्यक्ती आपले ज्ञान किंवा कौशल्य यांचा वापर करून पैसा प्राप्त करते व स्वतः करिता काम करते, दुसऱ्या कंपनीकरिता काम करीत नाही.

*** लेबल (label) ***

वस्तूची खरेदी करीत असताना ग्राहकाला त्या वस्तूची वैशिष्ट्ये कळावी म्हणून वस्तूंवर लेबल लावून उत्पादक ग्राहकांची मदत करीत असतो. आजकाल ग्राहक व उत्पादक यांचा संबंध वस्तू खरेदी करीत असताना येत नाही. त्यामुळे वस्तूबद्दल माहिती मिळवण्याचे साधन म्हणून लेबलचा उपयोग केला जातो. वस्तूवरील लेबलमुळे ग्राहकांना त्या वस्तूविषयीची माहिती प्राप्त होत असते. पर्यायी वस्तूंशी तुलना करून नंतर वस्तूची खरेदी केल्या जाते.

" वस्तूविषयी माहिती देणारे लेखी पत्रक म्हणजे लेबल होय."

लेबलवर मालाची माहिती, वापरण्यासंबंधी सूचना, वापरण्यात आलेला कच्चा माल, त्याचे प्रमाण, पदार्थ वापरण्याचा कालावधी अशा अनेक गोष्टींची माहिती दिलेली असते

Novelty

## *** लेबलचे प्रकार ***

लेबलचे दोन प्रकार असतात.
(अ) प्रत लेबल
(ब) प्रमाणित वर्णनात्मक लेबल.

(अ) प्रत लेबल (Grade label)

ज्या लेबलवर वस्तूच्या प्रतीच्या उल्लेख केलेला असतो. त्याला प्रत लेबल असे म्हणतात. प्रत पाहून ग्राहक त्या वस्तूची खरेदी करतात. कारण प्रत विश्वसनीय मानली जाते. उदा :- एगमार्क, ISI. ज्या वस्तूचे केवळ निरीक्षण करून वस्तूबाबत निवड करता येत नाही, त्यावेळी त्या वस्तूला प्रत लेबल लागले असल्यास निवड करणे सोपे जाते. एखादी संस्था वस्तूची वर्गवारी करून त्या वस्तूला विशिष्ट 'प्रत' देते.

(ब) प्रमाणित वर्णनात्मक लेबल :-

ज्या लेबलमध्ये वस्तूसंबंधी संपूर्ण माहिती दिली जाते, त्याला प्रमाणित, वस्तू तयार करण्याकरिता वापरलेला कच्चा माल, वस्तू वापरताना घ्यायची काळजी याबद्दल माहिती दिलेली असते. तसेच लेबलमध्ये अंवेष्टन करण्याची तसेच तारीख

वस्तु खराब होण्याची तारीख, उत्पादकाचे नाव याबद्दलही माहिती दिलेली असते. वस्तूची खरेदी करीत असताना ही माहिती वाचून निवड केली जाते.

लेबलवरील माहिती नेहमी सत्य असावी.

*** संवेष्टन (Packing) ***

उद्योजकाने वस्तूचे उत्पादन केल्या-नंतर ती वस्तु विविध भागात विक्रीकरिता पाठवली जाते. वस्तूची वाहतूक होत असताना वस्तु सुरक्षित राहण्याकरिता वस्तूला जे आवरण करण्यात येते, त्याला संवेष्टन असे म्हणतात. आधुनिक काळात संवेष्टना-ला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. वस्तूला आकर्षित रूपात संवेष्टित करून तिला ग्राहकांसमोर नेल्या जाते. याचा जाहिरातीकरिता उपयोग केल्या जातो.

"वस्तु ठेवण्याचे साधन किंवा डिझाइन निर्माण करणे म्हणजे संवेष्टन होय." आजच्या जाहिरातीच्या युगात उत्पादक आपण उत्पादित केलेल्या वस्तु आकर्षित रूपात संवेष्टित करून त्या ग्राहकांसमोर नेतात. परंतु यामुळे वस्तूच्या किमतीत जी वाढ होते त्याचा भार ग्राहकाला सहन करावा लागतो.

Novelty

## *** गृहव्यवस्थापनाच्या परिभाषा ***

कुठल्याही विषयाचा अर्थ समजावून घेण्याकरिता त्या विषयाची परिभाषा जाणून घेणे आवश्यक आहे. शास्त्रज्ञांनी विविध दृष्टिकोनातून गृहव्यवस्थापनाच्या परिभाषा मांडलेल्या आहेत.

गृहव्यवस्थापनाच्या परिभाषा खालीलप्रमाणे →

① डॉ. देवदास :→

गृहव्यवस्थापनांतर्गत कौटुंबिक लक्ष्य/उद्दिष्ट प्राप्त करण्याकरिता कौटुंबिक साधनसंपत्तीच्या उपयोगासंबंधी घेण्यात येणाऱ्या निर्णयांचा समावेश होतो.

कौटुंबिक उद्दिष्टपूर्तीकरिता साधनसंपत्तीसंबंधी घेण्यात येणाऱ्या निर्णयांना या परिभाषेत महत्त्व दिलेले ~~आहे~~. आहेत.

② ग्रॉस व क्रँडलच्या मते :→

"गृहव्यवस्थापन ही एक निर्णयांची शृंखला आहे. ज्यात उद्दिष्टये साध्य करण्याकरिता साधनसंपत्तीच्या योग्य उपयोग करण्याच्या प्रक्रियेचा समावेश होतो. या प्रक्रियेच्या तीन पायऱ्या आहेत. ① नियोजन, ② कार्य स्वतः करीत असताना किंवा दुसऱ्या व्यक्तीकडून करवून घेत असताना त्या

SEAL

Novelty

कार्याचे नियंत्रण, ③ भविष्यातील नियोजन करण्याकरिता उपयुक्त ठरणारे मूल्यांकन."

## कौटुंबिक अंदाजपत्रक : परिभाषा

① वेबस्टर शब्दकोषाप्रमाणे :-

"साधनसंपत्ती व खर्च यातील समन्वय साधण्याकरिता केलेली योजना म्हणजे अंदाजपत्रक होय."

② ग्रॉस आणि कॅन्डलच्या मते :-

"अंदाजपत्रक म्हणजे भविष्यात होणाऱ्या खर्चाचे नियोजन."

③ मॉर्गनच्या मते :-

"अंदाजपत्रक म्हणजे भविष्यकालीन खर्चासाठी योजना होय."

④ वेबरच्या मते :-

"कौटुंबिक अंदाजपत्रक म्हणजे कुटुंबाला मिळणाऱ्या उत्पन्नाच्या व्यवस्थित पद्धतीने अशा गोष्टीकरिता खर्च करायचा की ज्यामुळे कुटुंबातील अधिकाधिक सदस्यांना सुख प्राप्त होईल.

SEAL

Novelty

(5) रॉलस्टुप यांच्या मते :-

"अंदाजपत्रक म्हणजे कुटुंबातील प्रत्येक सदस्याला खर्च केलेल्या पैशापासून जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्यासाठी केलेले नियोजन होय."

वरील परिभाषांवरून असे लक्षात येते की, कौटुंबिक अंदाजपत्रक म्हणजे विचारपूर्वक तयार केलेला पैशाच्या खर्चाचा आराखडा किंवा योजना होय. कौटुंबिक अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश म्हणजे कुटुंबाचे उत्पन्न कशाप्रकारे खर्च करायचे, कसे वापरायचे आणि वेगवेगळ्या वस्तु, सेवा आणि बचत यामध्ये कसे विभाजन करायचे याची योजना होय. साधारणतः कौटुंबिक अंदाजपत्रकात नियमित होणारे खर्च तसेच अकस्मात येणारे खर्च व शक्य होत असल्यास बचतीची योजना असावी.

कौटुंबिक अंदाजपत्रकाद्वारे पुढील बाबींची माहिती मिळू शकते :-

(1) कुटुंबाचे एकूण उत्पन्न
(2) कुटुंबातील सदस्यांची संख्या, लिंग व वय
(3) खर्चाचे विविध स्त्रोत (Heads)
(4) अंदाजपत्रकाचा कालावधी
(5) बचत अथवा कर्ज

SEAL

Novelty

## ** संतुलित अंदाजपत्रक ** (Balance Budget)

या प्रकारच्या अंदाजपत्रकात उत्पन्न व खर्चामध्ये सदैव संतुलन असलेले आढळते. याला साधारण अंदाजपत्रक असेही म्हणतात. यामध्ये मिळणारे उत्पन्न व प्रस्तावित खर्च सारखा असतो. यामध्ये बचत ही दाखवल्या जात नाही तसेच कर्ज घेण्याची आवश्यकताही दाखवलेली नसते.

* संतुलित अंदाजपत्रक = मिळणारे उत्पन्न = प्रस्तावित खर्च

## **** बचतीचे अंदाजपत्रक ** (saving Budget)

या अंदाजपत्रकात प्रस्तावित खर्च हा अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी असतो. तसेच त्या काळात थोड्या प्रमाणात बचतही केल्या जाते. अर्थात सर्व आवश्यकतांवर खर्च केल्यानंतर उरलेले उत्पन्न दाखवले जाते. अशाप्रकारचे अंदाजपत्रक नेहमी लाभदायक असते. त्यामुळे कुटुंबाला सुरक्षितता लाभते. भविष्य काळासाठी ते निश्चित होतात.

* बचतीचे अंदाजपत्रक = प्रस्तावित खर्च < अनुमानित उत्पन्न.

## *** आदर्श अंदाजपत्रक *** (Standard Budget)

हे अंदाजपत्रक औसत कुटुंबाकरिता आदर्श खर्चाची रूपरेषा दर्शविते. यामध्ये जे अंदाजपत्रक उत्तम असते त्यांना आदर्श मानण्यात येते व त्याच्या आधारावर आगामी अंदाजपत्रक बनवल्या जाते.

## *** कलेच्या घटकांची नावे ***

कलेचे घटक 8 आहेत ते खालीलप्रमाणे.

1. रेषा
2. आकार
3. बनावट / पोत
4. रंग
5. प्रकाश
6. अवकाश
7. आकृतिबंध
8. विचार

*** अवकाशाचे प्रकार ***

① प्रत्यक्ष अवकाश

② अप्रत्यक्ष अवकाश

① प्रत्यक्ष अवकाश :-

"दृश्य किंवा प्रत्यक्षात उपलब्ध असलेली जागा म्हणजे प्रत्यक्ष अवकाश होय." उदा. एखाद्या मूर्तीच्या सभोवतालची जागा, ~~म्हणजे~~ फर्निचरच्या सभोवतालची जागा ही जागा द्विमितीय किंवा त्रिमितीय असू शकते.

② अप्रत्यक्ष अवकाश :-

"जी जागा प्रत्यक्षात अस्तित्वात नसते. पण ती जागा असल्याचा आभास निर्माण केला जातो. त्या जागेला अप्रत्यक्ष अवकाश असे म्हणतात." उदा :- चित्रकार चित्र काढताना चित्रात जवळचे झाड मोठ्या आकाराचे दाखवतो तर दूरचे झाड दाखविण्याकरिता लहान आकाराचा उपयोग करतो आणि प्रत्यक्षपणे जवळची व दूरची जागा निर्माण केल्या जाते.

अप्रत्यक्ष अवकाश हा द्विमितीय असतो. गृहसजावटीत अवकाशाचा उपयोग करून आकर्षकता व वैविध्यता

Novelty

निर्माण करता येते. उदा. खोलीत फर्निचरचा उपयोग करीत असताना खूप मोठ्या प्रमाणात फर्निचर वापरण्याऐवजी कमी प्रमाणात वापरून किंवा फर्निचरने लहान गट करून मोकळी जागा निर्माण करण्यात येते.

आजकाल घरात मोकळी जागा असायला हवी हा विचार दिसून येतो. याकरिता घरात मोठ्या दरवाजांचा वापर केला जातो. घरात काचेची भिंत तयार करून मोठे दरवाजे व खिडक्यांच्या सहाय्याने घरातील आतील जागा व बाहेरील मोकळी जागा यामध्ये संबंध प्रस्थापित केल्या जातो.

*** प्रकाशाचे प्रकार :***

① नैसर्गिक प्रकार :→ नैसर्गिक प्रकाश सुर्यापासून प्राप्त होत असतो. दरवाजे - खिडक्यांची योग्य प्रकारे योजना करून खोल्यांमध्ये नैसर्गिक प्रकाश प्राप्त करण्यात येतो. घरात भरपूर प्रमाणात प्रकाश येण्याकरिता काचांचा उपयोग करण्यात येतो. परंतु, प्रकाश कमी करायचा असल्यास दारे व खिडक्यांकरिता पडद्यांचा वापर करण्यात येतो. नैसर्गिक प्रकाशात सर्व वस्तू योग्य तऱ्हेने दिसतात. प्रकाश योग्य नसल्यास घरात केलेल्या सजावटीचे सौंदर्य लक्षात येत नाही.

SEAL
Novelty

(2)

## *** कृत्रिम प्रकाश ***

कृत्रिम प्रकाश बहुतांश विजेपासून प्राप्त करण्यात येतो. या प्रकाशाच्या उपयोगाने त्या खोलीतील वातावरणात आनंद किंवा उत्साहाची निर्मिती करता येते. ज्या वस्तूला किंवा ज्या ठिकाणी प्राधान्य निर्माण करायचे असेल त्या ठिकाणी जास्त प्रकाश आणि कमी महत्वाचा भाग किंवा पार्श्वभूमीवर कमी प्रकाशयोजना करून आकर्षक सजावट करता येते. कृत्रिम प्रकाशयोजनेच्या सहाय्याने संपूर्ण खोलीत सारख्या प्रमाणात प्रकाशाची निर्मिती करता येते. खोलीत अप्रत्यक्ष प्रकाशयोजना करून खोलीतील वातावरणात प्रसन्नता निर्माण करता येते.

कृत्रिम प्रकाशयोजनेचा वापर करायचा असल्यास आवश्यक तिथे दिवे लावून कार्यानुसार कमी-जास्त प्रकाशाची योजना करावी.

## ** नमुन्याचे प्रकार **

(1) परंपरागत नमुने
(2) आधुनिक नमुने

(1)
परंपरागत नमुने :- "ज्या नमुन्यांचा उपयोग अनेक पिढ्यांपासून केला जातो, त्याला परंपरागत

SEAL
Novelty

नमुने असे म्हणतात." ह्या नमुन्यांचा संबंध संस्कृती, धर्म, परंपरा यांच्याशी असतो. उदा. पैठणी साड्यांवरील नमुने, काश्मिरी गालिच्यांवरील विशिष्ट नमुने, भारतातील पारंपारिक रांगोळया, दांरवाचे नमुने इ.

* आधुनिक नमुने :-

"ज्या नमुन्यांचे उपयोग आधुनिक काळात करणे सुरु झाले, त्याला आधुनिक नमुने असे म्हणतात."
मात फ्रिहँड नमुन्यांचा वापर अधिक केल्या जातो.
मुक्त चित्रांचे नमुने Modern Art ह्या नमुन्यांचा यात समावेश होतो.

*** लयीचे प्रकार ***

लयीचे दोन प्रकार आहेत.

1. नियमानुसार लय.
2. स्वच्छंद लय.

SEAL

Novelty

① नियमानुसार लय :- ही लय निर्माण करण्याची सोपी पद्धत आहे. एखाद्या आकारमानाच्या वारंवार उपयोग करून ही लय साधता येते. नियमित अंतरावर पुनरावृत्ती केल्यामुळे संपूर्ण कलाकृतीत संबंध प्रस्थापित होतो. पुनरावृत्तीमुळे कलाकृतीतील सौंदर्य वाढते. परंतु त्यामध्ये तोचतोपणा येण्याची शक्यता असते.

② स्वच्छंद लय :- अनियमित अंतरावर विषम रेषांची मांडणी करून जी लय प्राप्त होते. तिला स्वच्छंद लय असे म्हणतात. अनियमित रेषेवरून डोळे सहज फिरतात. स्वच्छंद लयीच्या उपयोग संपूर्ण चित्र बघण्यासाठी केला जातो. स्वच्छंद लयीच्या उपयोगामुळे फर्निचर व इतर सर्व घटकवस्तू परस्पर-संबंधी आहेत असे वाटते.

① नियमानुसार लय :-

ही लय निर्माण करण्याची सोपी पद्धत आहे. एखाद्या आकारमानाच्या वारंवार उपयोग करून ही लय साधता येते. नियमित अंतरावर पुनरावृत्ती केल्यामुळे संपूर्ण कलाकृती संबंध प्रस्थापित होतो. पुनरावृत्तीमुळे कलाकृतीतील सौंदर्य वाढते. परंतु त्यामध्ये तोचतोपणा येण्याची शक्यता असते.

②

स्वच्छंद लय :- अनियमित अंतरावर विषम रेषांची मांडणी करून जी लय प्राप्त होते. तीला स्वच्छंद लय असे म्हणतात. अनियमित रेषेवरून डोळे सहज फिरतात. स्वच्छंद लयीच्या उपयोग संपूर्ण चित्र बांधण्यासाठी केला जातो. स्वच्छंद लयीच्या उपयोगामुळे फर्निचर व इतर सर्व घटकवस्तू परस्पर-संबंधी आहेत असे वाटते.

* नोंदणी दोन प्रकार *

नोंदणीचे दोन प्रकार आहे.

1. अस्थायी नोंदणी
2. स्थायी नोंदणी

(अ) अस्थायी नोंदणी :→ जे लघु उद्योग स्वयंरोजगार करण्याकरिता निवडलेले असतात. त्यांची सुरुवातीला अस्थायी नोंदणी करणे आवश्यक असते.

(ब) स्थायी नोंदणी :→ उद्योगाची अस्थायी नोंदणी करून उत्पादन सुरू केल्यानंतर तीन महिन्यांनी स्थायी नोंदणी करता येते.

1. ज्या वस्तूचे उत्पादन सुरू केले आहे, त्यासाठी उद्योजकाने आवश्यक ते परवाने घ्यायला हवे.

* गृहअर्थशास्त्राच्या विविध शाखा *

1. आहार व पोषणशास्त्र
2. कौटुंबिक साधनसंपत्ती व्यवस्थापन
3. वस्त्रशास्त्र
4. मानवविकास
5. विस्तारसेवा व संपर्क शिक्षण

Novelty

** गृहव्यवस्थापनाच्या पायऱ्या **

गृहव्यवस्थापन प्रक्रियेच्या तीन पायऱ्या पुढील प्रमाणे

① नियोजन
② नियंत्रण
③ मुल्यांकन

* मुल्यांकनाचे प्रकार *

मुल्यांकनाचे तीन प्रकार आहेत ते, पुढील प्रमाणे :-

(अ) औपचारिक मुल्यांकन
(ब) अनौपचारिक मुल्यांकन
(क) स्वमुल्यांकन

(अ) औपचारिक मुल्यांकन :- "ज्या मुल्यांकनात कामाच्या प्रत्येक घटकाचे सखोल व सविस्तर मुल्यांकन केले जाते, त्याला औपचारिक मुल्यांकन असे म्हणतात."

(ब) अनौपचारिक मुल्यांकन :- "ज्या वेळी मुल्यांकनात कामाच्या प्रत्येक घटकाचा सखोल विचार न करता संपूर्ण कार्य कसे झाले आहे याचा दर्जा ठरवला जातो, त्याला अनौपचारिक मुल्यांकन असे म्हणतात.

SEAL

Novelty

(क) स्वमुल्यांकन :- ज्या वेळी कार्य करणारी व्यक्ती आपल्या कार्याचे स्वतःचे मुल्यांकन करते त्याला स्वमुल्यांकन असे म्हणतात.

* साधनसंपत्तीची परिभाषा :- *

विविध शास्त्रज्ञांच्या मतानुसार साधनसंप- परिभाषा खालीलप्रमाणे -

(1) रेंडम हाऊस शब्दकोष :- " संचित करण्यात आलेल्या पुरवठ्याच्या आधाराच्या व मदतीच्या स्रोताला साधन असे म्हणतात.

(2) मॅकलाक डिकन :- " मागण्या पूर्ण करण्याकरिता आवश्यक शक्तिशाली असणारी व उपलब्ध असणारी साधने म्हणजे साधनसंपत्ती होय.

* रेषेचे प्रकार *

(अ) आडव्या रेषा (Horizontal line)
(ब) उभ्या रेषा (vertical line)
(क) तिरप्या रेषा (Diagonal line)
(ड) वक्राकार रेषा (curved line)
(इ) जाड व बारिक रेषा

SEAL

Novelty

* पोताचे प्रकार *

पोताचे दोन प्रकार आहेत :-

① स्पर्शजन्य पोत :-

② दृक्पोत :-

① स्पर्शजन्य :- वस्तुला स्पर्श केल्यानंतर वस्तुच्या पृष्ठभागाच्या स्पर्शेंद्रियांमुळे जाणवणारा गुणधर्म म्हणजे स्पर्शजन्य पोत होय. उदा.:- कापड

② दृक्पोत :- काही वस्तूंचे पोत त्या वस्तुला स्पर्श न करता केवळ डोळ्यांनी पाहून समजते. त्याला दृक्पोत असे म्हणतात उदा :- फरशी, रेती, सॅंडपेपर.

** आकाराचे प्रकार **

① भूमितीय आकार
② नैसर्गिक आकार
③ मुक्त आकार
④ असत्य आकार

* पुष्परचनेची व्याख्या :- " विभिन्न प्रकारच्या फुला-पानांना पुष्पपात्रात कल्पकतेने आणि मोजकतेने सुंदर आकारात सजविले असल्यास त्यास पुष्परचना असे म्हणतात."

SEAL

Novelty

मॅना हॅग २८ यांच्या मते, "फुले, इतर झाडांचे साहित्य आणि पुष्पपात्र यांचे रंग, पोत, व आकार यात संतुलन निर्माण करून संघटित केलेली रचना म्हणजे पुष्परचना होय. वातावरणात उत्साह, चैतन्य व सौंदर्य वाढवणे हा पुष्परचनेचा उद्देश असतो."

** प्राधान्याची परिभाषा **

मॅना हॅग २८च्या मते ;- "प्राधान्य हे कलेचे असे तत्व आहे की, ज्यामुळे कुठल्याही योजनेमध्ये प्रभावकारी विचार किंवा रेषाकडे लक्ष केंद्रित केल्या जाते.

सजावटीकरिता असताना वस्तूचे स्वरूप विचारात घेऊन, आकर्षक वस्तूची निवड करून योजना केल्यास आकर्षक सजावटनिर्मिती होत असते.

* संतुलनाची व्याख्या *

हॅरिएट व व्हेटा गोल्डस्टिनच्या मते :-> "संतुलन म्हणजे आराम किंवा विश्रांती आहे. विविध आकार व रंग केंद्राच्या चारही बाजूंना एकत्रित करून आरामदायक प्रभाव प्राप्त केल्या जातो. यामुळे केंद्राच्या प्रत्येक बाजूला सारखे आकर्षण निर्माण होते."

मॅना हॅगरटच्या मते, "केंद्रबिंदूच्या प्रत्येक बाजूला समान आकर्षणाचा परिणाम म्हणजे स्थिरता व संतुलनाची भावना होय."

SEAL

** नियोजनाची व्याख्या **

नियोजन ही गृहव्यवस्थापनाची पहिली पायरी आहे. गृहव्यवस्थापनात नियोजनामुळे व्यक्तीला साधनांच्या उपयोगाने शक्यतो ध्येयाची प्राप्ती करण्याकरिता मार्ग शोधता येतात. ध्येयप्राप्ती करण्याकरिता मार्गदर्शन करीत असल्यामुळे ही अत्यंत महत्वाची पायरी आहे. नियोजन करणे म्हणजे कामाची पूर्वतयारी करणे होय.

*** नियंत्रणाची व्याख्या ***

गृहव्यवस्थापनातील दुसरी व अतिशय महत्वाची पायरी म्हणजे नियंत्रण होय. कारण नियंत्रणात योजना प्रत्यक्षात कार्यान्वित केल्या जाते. कारण योजना आखल्या तरीही प्रत्यक्षात काम सुरू करणे आवश्यक असते. योजनेनुसार काम करण्यास सुरुवात न केल्यास योजना यशस्वी होऊ शकणार नाही. तसेच या पायरीमध्ये काम योजनेनुसार होत आहे किंवा नाही हे बघितल्या जाते. काही नवीन नियम घ्यावे लागतात.

*** रेषेची व्याख्या ***

प्रत्येक प्रकारच्या कलाकृतींमध्ये रेषांचा उपयोग केला जातो. गृहसजावटीत देखील रेषेला महत्वाचे स्थान आहे. रेषेच्या एकत्र येण्याने विविध आकार तयार झालेले आढळतात.
'दोन बिंदूना जोडणाऱ्या घटकाला रेषा असे म्हणतात.

*** कलेची व्याख्या ***

कला आपल्या जीवनातील एक अविभाज्य अंग आहे. प्रत्येकाच्या जीवनात प्रत्येक गोष्टीचे सौंदर्य आकर्षक वाढवण्याकरिता किंवा दर्शविण्याकरिता कलेचा वापर केला जातो. निसर्गात आपल्या आजूबाजूला अनेक सुंदर कलाकृतींचा संगम असलेला ~~आढळतो~~ आढळतो. घराची सजावट करीत असताना कलेच्या घटकांचा योग्य प्रकारे उपयोग करणे आवश्यक असते.

* लयीची व्याख्या *

लय हे कलेचे महत्वाचे तत्व आहे. निसर्गात देखील अनेक वस्तूंमध्ये लय आढळून येते. उदा. समुद्रलहरी, झऱ्याचा झुळझुळ आवाज, हृदयाचे ठोके इ. लय म्हणजे हालचाल होय. लय म्हणजे संबंधित असलेला मार्ग, ज्याच्या मदतीने रेषा व

SEAL

R.E.

रंगा सावरून नजर सहजपणे फिरू शकते. एखाद्या कलाकृतीमध्ये लय असल्यास वातावरणात शांतता व आनंदनिर्मिती होते.

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15